प्रकरण ४ थे

मिरज संस्थानीतील कायदेमंडळाचे स्वरूप, अधिकार व कार्य

प्रकरण चौथे

मिरज संस्थानांतील कायदेमंडळाचे

स्वरूप, अधिकार व कार्य

मिरज संस्थानातील रयतेच्या लढयातून आणि प्रजा-परिषदेच्या चळवळीतून अखेर मिरज संस्थानात कायदे मंडळाची स्थापना करण्यात आली. सुरवातीस कायदेमंडळ संपूर्णत: लोकानुवर्ती नसले तरी त्यात लोकांचे प्रतिनिधी काही प्रमाणात होते. परंतु लोकमताच्या व जनतेच्या चळवळीच्या दबावामुळे हळू हळू कायदेमंडळ लोकांची ख-या अर्थाने प्रतिनिधी सभा बनली. प्रस्तुत प्रकरणात मिरज संस्थानातील कायदे मंडळाचे स्वरूप अधिकार आणि कार्य यांचा परामर्श घेण्यात आला आहे.

दक्षिण संस्थान प्रजा-परिषदेचे पहिले अधिवेशन ता. २४ व २५ मे १९२१ रोजी पुणे येथे भरले होते. त्यापूर्वी जे जाहीर विनंती पत्रक कै. न.चि. केळकर व कै. अ.वि. उर्फ वामनराव पटवर्धन यांच्या सह्यांनी प्रकाशित झाले होते, त्या पत्रकात, "संस्थानांत कायदे करण्याकरिता कायदेमंडळाची स्थापना करून त्यामध्ये संस्थानी प्रजेचे प्रतिनिधी घ्यावे" अशी मागणी केली होती. या सूचनेप्रमाणे दक्षिण संस्थान प्रजा-परिषदेच्या पहिल्या अधिवेशनात, संस्थानिकांनी प्रजा-प्रतिनिधि संस्था स्थापून त्यांना कायदे करण्याचा अधिकार द्यावा, खाजगी खर्चा व्यतिरिक्त संस्थानचे सर्व अंदाजपत्रक चर्चेसाठी कायदे मंडळापुढे ठेवावे, जुलमी आणि नागरिक-स्वातंत्र्यावर घाला घालणारे कायदे रद्द करण्यांत यावेत असे महत्वाचे ठराव मंजूर केले होते.[१]

मिरज संस्थानात प्रजा-परिषदेची स्थापना १९२२ साली झाली. या परिषदेने आपल्या पहिल्या अधिवेशनात, मिरज संस्थानात संस्थान-

धिपतीच्या अधिपत्याखाली जबाबदार राज्यपध्दतीची मागणी केली होती व त्या दिशेने वाटचाल करण्याकरिता, राज्यकारभाराच्या हर एक बाबतीत मदत करण्याकरिता लोकनियुक्त सभासदांचे "एक मंडळ" म्हणजेच कायदे मंडळाची स्थापना करावी अशी मागणी श्रीमंत राजे-साहेबांकडे केली होती.[२] परंतु श्रीमंतांनी प्रजेने केलेल्या मागणीनुसार ताबडतोब मंडळाची निर्मिती केली नाही.

ब्रिटिश सरकारने संस्थानिकांना फेडरेशनमध्ये सहभागी होण्याचे जेव्हा कळविले तेव्हा, मिरज संस्थानच्या राजेसाहेबांनी प्रजेला काही तरी देण्याच्या हेतूने, ता. १४ जुलै १९३१ रोजी कायदे मंडळाचे पवित्र दान देण्याची जाहीर घोषणा केली. श्रीमंत राजेसाहेब श्री. गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन यांनी, कायदेमंडळ स्थापनेकरिता एक जाहीरनामा १४ जुलै १९३१ रोजी काढून मिरज संस्थानातील प्रजेला राज्यकारभारात सहभागी करण्याकरिता "कायदे मंडळाची स्थापना"करण्याचा मनोदय व्यक्त केला व त्याचे स्वरूप, अधिकार व कार्य ठरविण्याकरिता संस्थानचे दिवाण श्री. बा.का. जोशी यांची समितीही नेमली. अशा रितीने मिरज संस्थान प्रजेच्या "कायदेमंडळ" निर्माण करावे या मागणीला जवळ जवळ दहा वर्षांनंतर यश मिळाले होते.

मिरज संस्थानातील प्रजेला, "कायदेमंडळाचे पवित्र दान" करते समयी श्रीमंत राजेसाहेब म्हणाले की, "लोक आमच्याकडे आले नाहीत. तथापि आम्ही आमचे कर्तव्य करीत आहोत."[३] तसेच श्रीमंत राजेसाहेबांनी कायदे मंडळ स्थापन करण्याच्या १४ जुलै १९३१ च्या जाहीरनाम्यात असे म्हटले की, मिरज संस्थानच्या प्रजेनीं संस्थानच्या राज्यकारभारात जास्तीत जास्त प्रमाणात सहभागी व्हावे म्हणून हे कायदे मंडळ स्थापण करण्यात आले व याप्रमाणे येथून पुढे कायदेमंडळाची अधिवेशने वारंवार घेतली जातील.[४]

मिरज संस्थानच्या श्रीमंतानी संस्थाने दिवाण, श्री. बा.का. जोशी या एका व्यक्तीची समिती कायदे मंडळाचे स्वरूप, अधिकार व कार्य ठरविण्याकरिता नेमली होती. या समितीने प्रजेला राज्यकारभारात सहभागी होण्याकरिता कोण कोणते अधिकार यावेत असा अहवाल श्रीमंताकडे पाठविला होता. याच कालखंडात मिरज संस्थानातील प्रजेमध्ये सारावाढ, सभा बंदी, परस्थ कायदा" याचा अंमल आणि कायदेमंडळाचे अधिवेशन भरविण्याकरिता श्रीमंताचे धोरण दिरंगाईचे असल्यामुळे असंतोष निर्माण झाला होता. मिरज संस्थानातील प्रजेमधील हा असंतोष कायदेमंडळ प्रत्यक्षापणे स्थापण केल्याशिवाय थांबणार नाही याची कल्पना प्रजा-परिषदेच्या पुढा-यांनी श्रीमंताना दिली होती. श्रीमंत राजेसाहेबांनी यास अखेर मान्यता देऊन संस्थानचे दिवाण, श्री. जोशी, समितीच्या शिफारशी प्रमाणे संस्थानासाठी "एक कायदेमंडळ" स्थापन करण्याकरिता ता. २०/२/१९३२ रोजी, संस्थानच्या स्टॅट गॅझीट द्वारे, जाहीरनामा प्रसिध्द करून, तो मिरज संस्थान कायदेमंडळ नियम नं. १ ऑफ १९३२ चे कायदे कानुन व स्टॅंडिंग ऑर्डस म्हणून अंमलात आणला. त्याची अंमल बजावणी मिरज संस्थानात ता. २२/२/१९३२ पासून करण्यात आली.[५] अशा रितीने श्रीमंत राजेसाहेबानी कायदेमंडळाची स्थापना करून भविष्य काळातील राजकीय सुधारणेचा पाया घातला.

मिरज संस्थान कायदेमंडळाचे सुरवातीचे स्वरूप, अधिकार व कार्य

या जाहीरनाम्याप्रमाणे मिरज संस्थान कायदेमंडळात एकूण २६ सभा

सद असतील. त्याची विभागणी ही १३ लोक नियुक्त सभासद व १३ सरकारनियुक्त सभासद अशी केली होती. सरकार नियुक्त सभासदापैकी संस्थानचे दिवाण हे कायदेमंडळाचे अध्यक्ष होते आणि उपाध्यक्षाची निवड ही २६ सभासदांपैकी केली जाणा अशी तरतूद होती.

मिरज संस्थान कायदे मंडळाच्या वरील स्वरूपाप्रमाणे श्रीमंत राजेसाहेबानी स्वत:च्या अधिकारान्वये कायदेमंडळातील एकूण २६ सभासदाची नियुक्ती केली.

श्रीमंत राजेसाहेबांनी सरकारी नियुक्त १३ सभासदांची विभागी ही ७ सरकारी सभासद आणि ६ बिनसरकारी सभासद अशी केली. त्यांची नावे खालील प्रमाणे होती.

अ) सरकार नियुक्त,सरकारी सभासद ७:

१) संस्थानचे दिवाण, श्री. बाबुराव काशिनाथ जोशी (अध्यक्ष)

२) श्री. वि.स. पोलकर,

३) श्री. वि.पा. बेडेकर,

४) श्री. द.शी. भडभडे,

५) श्री. पा.ग. वारवे,

६) श्री. रा.मा. बेडेकर,

७) श्री. वि.वि. तुर्लेकर.

ब) सरकार नियुक्त बिनसरकारी सभासद ६:

१) श्री. द.य. शिंदे,

२) श्री. ब.दो. तट्टी,

३) श्री. द.व्य. गाडगोळी,

४) श्री. मजलापूरकर इनामदार,

५) श्री. वा.ना. शहा,

६) श्री. स.मा. मराठे.

२) लोकनियुक्त १३ सभासद:

पुढील १३ व्यक्तीची नियुक्ती लोक नियुक्त सभासद म्हणून श्रीमंतानी केली होती.

१) श्री. बा.शा. धुळी, २) श्री. दि.च. झारी, ३) श्री. ना.बा. आरंडे, ४) श्री. रा.बा. खुळे, ५) श्री. गो.व्यं. शिंदे, ६) श्री. भा.वा. मराठे (उपाध्यक्ष), ७) श्री. य.मु. शेटे, ८) श्री. भा. मो. आडविरेकर, ९) श्री. ना.वि. जोशी, १०) श्री. के.शी. शेटजी, ११) श्री. आर.ए. येशुमाळी, १२) डॉ. प्राणी आर. एच्. १३) श्री. ग.वि. सन्मुख.[६]

अधिकार व कार्याचे स्वरूप:

मिरज कायदे मंडळाच्या अधिकाराचे स्वरूप असे होते की, कायद्याच्या विधेयका व्यतिरिक्त, कायदेमंडळातील सभासदांना अंदाजपत्रकीय विधेयकावर चर्चा करण्याचा किंवा त्यामध्ये ठराव मांडने दुरुस्त्या करण्याचा अधिकार

होता. लोक नियुक्त सभासदांना ठराव मांडव्याचा किंवा प्रश्न विचारण्याचा अधिकार दिला होता. तसेच कायदेमंडळातील सभासदांना भाषण करण्याचाही अधिकार दिला होता. परंतु श्रीमंताच्या खाजगी खर्चावर चर्चा करण्यास बंदी होती.[७] कायदेमंडळाची कार्यकाल हा तीन वर्षांचा केला होता. मिरज संस्थानचे दिवाण हे कायदे मंडळाचे अध्यक्ष असून त्यांना शिफारशी करण्याचा अधिकार होता.

वरील प्रमाणे मिरज संस्थानच्या कायदेमंडळाचे स्वरूप, अधिकार व कार्य निश्चित केले होते. लोकमतानुसार राज्यकारभार करण्याच्या दृष्टीने हे अधिकार जरी अल्प स्वरूपाचे असले तरी या व्यासपीठामार्फत प्रजा प्रतिनिधींनी पुढे अनेक मागण्या ठराव रूपाने श्रीमंताकडे सादर केल्या होत्या व त्याची पूर्तता करण्याकरिता वारंवारपणे भरविले गेलेल्या अधिवेशनांत चर्चा ही केली होती.

मिरज संस्थान कायदेमंडळाचा उद्घाटन समारंभ, मिरज संस्थानचे अधिपती श्रीमंत सर गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन यांच्या हस्ते शनिवार ता. २० फेब्रुवारी १९३२ रोजी मिरज राजवाड्यातील दिवाणखान्यात पार पडला. यावेळी मिरज संस्थानातील तालुक्याचे प्रतिनिधी, मिरज शहरातील प्रमुख स्त्री, पुरुष, अधिकारी वर्ग, युवराज श्रीमंत तात्यासाहेब हे हजर होते. या कार्यक्रमास के. न. चि. केळकर, के. ग.र. अभ्यंकर, श्री. गणपतराव गोडबोले, श्री. हरिभाऊ टिळक, श्री. महाबळ (जमखंडी) इत्यादी संस्थान बाहेरील कार्यकर्ते मंडळी हजर राहिली होती.

मिरज संस्थान कायदेमंडळ उद्घाटन प्रसंगी श्रीमंताचे भाषण:

श्रीमंत राजेसाहेबांनी दरबार भरवून कायदेमंडळाचे पवित्र दान केल्याचे

संस्थानातील प्रजेना सांगितले. कायदेमंडळाच्या स्थापनेमुळे काही अधिकार प्रजेच्या प्रतिनिधींना दिले जातील त्यामुळे प्रजेच्या प्रतिनिधींनी प्रजेच्या हक्काबद्दल सदैव जागृत राहून हा उपक्रम यशस्वी करावा असे ही ते म्हणाले. पुढे श्रीमंत आपल्या भाषणांत म्हणाले की, "अधिकार दान, मजपाशी जे कांही आहे ते प्रजेचे आहे" ते देत आहे. त्यामुळे प्रजा-प्रतिनिधीवरील जबाबदारी वाढली आहे. "मी तुमचा व तुम्ही माझे" ह्यासाठी आवश्यक असणारे सामर्थ्य परमेश्वराने द्यावे म्हणजे माझे व प्रजेचे कल्याण साध्य होईल." या प्रसंगी अभिनंदनपर भाषण करताना श्री. न.चिं. केळकर म्हणाले की,

के. न.चि. केळकरांचे अभिनंदनपर भाषण:

मिरज संस्थान हे लहान आहे आणि त्यामध्ये हे लहानसेच कायदे-मंडळ आहे. श्रीमंतानी राजा व प्रजा एकत्वासाठी अधिकार दान करून लोक प्रतिनिधीवर जबाबदारी सोपवून राज्यकारभारात हळूवारपणे सहभागित्वाचे तत्व मान्य केले आहे. मिरज संस्थानातील राजकीय सुधारणेचा हा पहिला हप्ता आहे, त्याचेच रूपांतर पुढे जबाबदार राज्य-पध्दतीत होईल अशा रितीने श्रीमंतानी प्रजेला राज्यरूपी अंगठी दिली आहे. संस्थानी राज्य म्हणजे अंगठीच्या खड्यावरील राज्य होय. म्हणूनच श्रीमंतानी कायदे मंडळाची स्थापना करून स्वराज्याची प्रस्तावना केली आहे. श्रीमंताच्या या अधिकार दानाने मिरज संस्थानात उत्क्रांती होत जाईल.

के.श्री. ग.र. अभ्यंकर अभिनंदनपर भाषण:

आपल्या भाषणात अभ्यंकर यांनी लोकमतानुसार राज्यकारभाराचा

प्रारंभ या दृष्टीने कायदेमंडळाचा हा उपक्रम अतिशय उत्कृष्ट असून त्याच्या अधिकारात वाढ ही चांगल्या त-हेने थोडयाच काळात होईल, असे श्रीमंताच्या अभिनंदनपर भाषणातून सांगितले होते.[६]

मिरज संस्थान प्रजा-परिषदेमार्फत अभिनंदन

"सध्याच्या युगांत ज्याला सुधारलेली राज्यपध्दती म्हणतात ती लोकतंत्रीक शासन पध्दती होय. ह्या प्रमाणे शासनपध्दती निर्माण करण्याचा प्रयत्न सर्वभारतामध्ये प्रजेमार्फत चालु आहे. त्यास अनुसरून मिरज कायदेमंडळाची स्थापना संस्थानच्या इतिहासात स्मरणीय होय" म्हणून श्रीमंताचे अभिनंदन प्रजा-परिषदेच्यावतीने करण्यात आले होते.[८]

मिरज संस्थान कायदेमंडळाचे पहिले अधिवेशन व पहिलेच अंदाजपत्रक १९३२

श्रीमंत राजेसाहेबांनी मिरज संस्थानातील प्रजेला कायदेमंडळाने दान करून दूरदृष्टी दाखवली होती. कायदेमंडळाच्या घटनेत कायदे मंडळाची अधिवेशने वारंवार भरवली जातील अशी तरतूद केली होती. त्यानुसार मिरज संस्थानच्या कायदेमंडळाचे पहिले अधिवेशन ता. २०/९/१९३२ रोजी मिरज जिल्ह्यातील दिवाणखान्यात संस्थानचे दिवाण, श्री. बाबुराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. हे अधिवेशन ता.२३/९/१९३२ पर्यंत म्हणजे एकूण चार दिवस सतत चालू होते.

कायदेमंडळातील लोकनियुक्त आणि सरकारनियुक्त सभासदांची

नियुक्ती स्वत: श्रीमंत राजेसाहेबांनी केली होती. मिरज संस्थान कायदेमंडळाच्या अधिवेशनाच्या सुरवातीस नव्या सभासदांचा शपथविधी कार्यक्रम पार पाडला आणि त्यानंतर श्रीमंत राजेसाहेब हे कायदेमंडळाच्या अध्यक्षस्थानी हजर राहीले.

कायदेमंडळ अधिवेशन प्रसंगी श्रीमंतांचे भाषण

श्रीमंत सर श्री. गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन यांनी कायदेमंडळ अधिवेशन प्रसंगी भाषण केले, त्या भाषणात ते म्हणाले की, आमची प्रजेबद्दल सद्भावना आहे, प्रजेबद्दल आमची आपुलकीची भावना अत्यंत उत्कट आहे. राजा आणि प्रजा यामधील संबंध हे "देव माझा, मी देवाचा" या प्रमाणे राहील".

त्यानंतर, संस्थानचे फडणीस श्री. बेडेकर, श्री. सिटी मॅजीस्ट्रेट श्री. पोतनीस यांनी कायदेमंडळ अधिवेशनांत अंदाजपत्रक विधेयक मांडले. अंदाज पत्रकाच्या जमा बाजूस ६ लाख २५ हजार २९१ रुपये व खर्च बाजूस ६ लाख २४ हजार ४५ रुपये दाखविले होते. खर्च बाजूकडील खाजगी खर्च उत्पन्नांच्या शेकडा २०% दाखीवला होता. त्याची एकूण १ लाख ९ हजार ५४७ रुपये इतकी होती. लोकोपयोगी कामाकरिता शे.१६% म्हणजे ९६ हजार २६२ रुपयेव खर्च दाखविला होता. या अंदाजपत्रकावर ता. २१/९/१९३२ रोजी चर्चा सविस्तरपणे झाली. त्यामध्ये दरबारने प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष कसे केले, यावर खर्च होणाऱ्या रक्कमेत काटकसर, कशी केली, शेतकऱ्यांच्या सारा सुटीबाबत एक पैशाची तरतुद नाही, लोकल फंडाच्या शिलकीचा उल्लेख नाही. पोलिस व

न्यायकोर्टवर बेसुमार खर्च दाखविला परंतु कामकाजामध्ये सुधारणा नाही, जनावरांच्या दवाखान्याची सोय नसल्याची, व्यापा-याच्या उत्तेजनार्थ पैशाची मुदत करणार की नाही, मिरज दवाखान्यातून औषध पुरवठा अपूरा आहे. वगैरे संबंधी कायदेमंडळात चर्चा झाली. त्यानंतर तो. २२/९/१९३२ रोजी कायदेमंडळाचे अधिवेशन लोक नियुक्त प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांनी पार पडले. डॉ. प्राणी यांनी जे महत्वाच्या विषयासंबंधी प्रश्न विचारले होते, ते म्हणजे मिरज संस्थानात, मिरज लक्ष्मेश्वर, मोडनिंब येथील दवाखान्यातील प्रत्येकी रोग्यांची संख्या किती ? त्यावर औषधोकरिता किती खर्च होतो ? त्याचे प्रत्येक रोग्यांशी रोजचे प्रमाण काय ? अशाच प्रकारे प्राथमिक शाळेची मागणी कीती झाली ? किती शाळा दिल्या ? असल्यास कोठे व कारण काय ? विद्याखात्याचा वार्षिक अहवाल प्रसिध्द होते काय ?

दिनांक २३/९/१९३२ रोजी मिरज संस्थान कायदेमंडळाचे अधिवेशन भरून त्यामध्ये खालील ठराव मंजूर केले होते.

१) मिरज संस्थानात पाणी पुरवठा करावा,
२) मागासलेल्या वर्गाची शैक्षणिक सोय करावी,
३) सभासबंदीचा परस्थांचा कायदा रद्द करणे,
४) शेतक-याची आर्थिक स्थिती सुधारणे,
५)प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तिचे करणे,
६) व्यापा-यास उत्तेजन देणे.[९]

मिरज संस्थान कायदेमंडळाच्या अधिवेशनांत वरील प्रमाणे महत्वाचे ठराव मंजूर केले होते. परंतु श्रीमंत राजेसाहेबांनी त्यांची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे मिरज संस्थानचे कायदेमंडळ हे दिखाऊ स्वरूपाचेच होते.

असे मिरज संस्थानी प्रजेला वाटले. कारण मिरज संस्थानात कायदे-मंडळाची स्थापना होऊन ही श्रीमंताच्या "हम करो सो कायदा" या वृत्तीत कसल्याहीप्रकारे बदल झाला नाही.

या अधिवेशनाचे अध्यक्ष, संस्थानचे दिवाण, श्री. बा.का. जोशी यांनी मात्र नि:पक्षपातीपणे काम बजाविले.

मिरज संस्थान कायदेमंडळाचे अधिवेशन दुसरे १९३४.

मिरज संस्थान कायदेमंडळाचे दुसरे अधिवेशन सोमवार ता. १५ जानेवारी १९३४ पासून ता. १८ जानेवारी १९३४ पर्यंत एकूण चार दिवस संस्थानचे दिवाण श्री. बा.का. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. अधिवेशनाच्या सुरुवातीस श्रीमंत राजेसाहेब येऊन भाषण करतील असे गृहीत धरले होते परंतु ते आले नाहीत. त्यामुळे संस्थानचे गृहमंत्री, श्री. पोतनीस यांनी मागील अधिवेशनातील प्रश्न-ठरावा संबंधी दरबारने काम केले हे सांगितले. कायदेमंडळाच्या अधिवेशनातील पहिल्या दिवशी "सभा बंदी" कायद्यात दुरुस्ती केल्याचे सांगितले. या प्रमाणे मिरज संस्थानात राजकीय सभांशिवाय, बिगर राजकीय सभेना परवानगीची गरज राहिली नाही. सभा बंदीच्या कायद्यात दुरुस्ती केल्याबद्दल ना. शहा वकीलांनी श्रीमंताचे अभिनंदन करणारा ठराव मांडला व तो सर्वानुमते मंजूर झाला.

त्यानंतर गृहमंत्री पोतनीस यांनी कायदेमंडळात अंदाजपत्रक मांडले त्यानंतर ना. घोलकर, यांनी आर्म्स ॲक्ट दुरुस्ती करून लागू करण्याचा ठराव मांडला व तो मंजूर झाला आणि कायदेमंडळाच्या अधिवेशनाच्या पहिल्या

दिवसाचे कामकाज समाप्त झाले.

अधिवेशनाचा दिवस दुसरा, मंगळवार ता.१६ जानेवारी १९३४.

मिरज संस्थानच्या कायदेमंडळ अधिवेशनाच्या दुस-या अधिवेशनाच्या दुस-या दिवशी, बाशीर्ल लाईट रेल्वे कामासाठी ज्यांच्या जमिनी रेल्वे कंपनीकडे गेल्या त्याची नुकसान भरपाई मिळावी, मुन्सिफ कोर्ट जागा, शेतसारा तहकूबी बाबत, ढबळी गायरान, वेताळ देवस्थानचे (मोडनिंब) उत्पन्न, देवस्थान पंचाकडे देण्याबाबत प्रश्नोत्तरे झाली. यानंतर ना. मराठे, ना. शहा, ना. जोशी, ना. आडविरेकर, ना. गाडगोळी या लोकनियुक्त सभासदांनी अंदाजपत्रकीय विधेयकावर चर्चा करून ते पसंत नसल्याचे सांगितले आणि सरकारतर्फे निरनिराळ्या खात्यावर होणा-या खर्चावर टीका केली होती. त्यानंतर आर्म्स ॲक्ट, इंडियन इलेक्ट्रीसिटी संबंधीचे ठराव मंजूर केले परंतु यावेळी लोकनियुक्त सभासद हे तटस्थ राहीले. श्रीमंतानी पुढे या ठरावांस मान्यता दिली.

दुसरे अधिवेशन दिवस तिसरा, बुधवार ता. १७ जानेवारी १९३४

मिरज संस्थान कायदेमंडळाच्या अधिवेशन दुसरे, यातील तिस-या दिवशी प्रारंभी प्रश्नोत्तरे झाली. त्यानंतर खालील ठराव मंजूर केले होते.

१) स्टेशन जवळील जागा ॲक्विझीसन किंमतीप्रमाणे विकणे,

२) स्त्रियांना पाचवी पर्यंतचे शिक्षण देणे,

३) आयुर्वेद दवाखान्याची स्थापना खेडयात करणे.

दुसरे अधिवेशन दिवस चौथा गुरुवार, ता.१८ जानेवारी १९३४

या दिवशी प्रारंभी ना. जोशी, ना. गाडगोळी, ना. प्राणी यांनी प्रश्न विचारल्यानंतर, शेतक-यांची परिस्थिती सुधारणेकरिता एक समिती नेमण्याचा ठराव मांडला व त्यास सरकारनेही मान्यता दिली. त्यानंतर मालगांव येथे पहिली ते तिसरीपर्यंतचे वर्ग सुरु करण्याचा ठराव मांडला, तो ब-याच वाटाघाटीनंतर सरकारतर्फे मान्य असल्याचे जाहीर केले. अशाच प्रकारे शेवटी "प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारा ठराव मंजूर केला.

मिरज संस्थान कायदेमंडळाचे दुसरे अधिवेशन वरील प्रमाणे चार दिवस भरून पार पडले परंतु कायदेमंडळाच्या कामकाजात कसल्याही प्रकारे बदल झाला नाही. शेतसारा सूट, जाजगी खर्च, व्यापा-यास उत्तेजन देणारी योजना ही दरबाराकडून लवकर मान्य झाली नाही. या संदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल एवढेच सांगितले गेले.[१०]

मिरज संस्थान कायदेमंडळाचे तिसरे अंदाजपत्रक अधिवेशन १९३५

मिरज संस्थान कायदेमंडळाचे तिसरे अंदाजपत्रकी अधिवेशन ता.२५/६/१९३५ रोजी श्री. भा.वा. मराठे यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या अधिवेशनात अंदाजपत्रक विधेयक मांडण्यात आले. मिरज कायदेमंडळाच्या तिस-या अंदाजपत्रक अधिवेशनाचे कामकाज ता. २८/६/१९३५ अखेर म्हणजे एकूण चार दिवस चालले होते. मिरज संस्थान कायदे मंडळाचे अंदाजपत्रकात संस्थानची जमा रक्कम, ५ लाख ७५ हजार, २५३ दाखवली आणि खर्च रक्कम,

५ लाख ७३ हजार, ४६१ रुपये धरली होती. श्रीमंताच्या खाजगी खर्चा-करिता १ लाख १२ हजार रुपये राखून ठेवण्यात आले होते.

या अंदाजपत्रक विधेयकावर ना. तट्टी, ना. गाडगोळी, ना, प्राणी, ना. आडविरेकर यांनी अनेक प्रश्न विचारून ते छाननी न करताच चुकीच्या पध्दतीने कसे सादर केले हे स्पष्ट केले. या शिल्लकी अंदाजपत्रकामध्ये शेतक-यांच्या सारा सूट किंवा तगाई संबंधी कोणत्याच प्रकारची तरतूद नसल्याचे लोकनियुक्त सभासदांनी सरकारपक्षाच्या सभासदांच्या निदर्शनास आणले होते. या वर्षी पाऊस कमी झाल्याने पीके बुडाली, गुरे ढोरे उपाशी पडत आहेत म्हणून सरकारने तगाई जाहीर करावी असा ठराव ना. सन्मुख यांनी मांडला होता. परंतु पूर्वीच्या अधिवेशनांत शेतक-यां-च्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्याकरिता सरकारने समिती नेम-ण्याचे मान्य केल्यामुळे ह्या ठरावांचा विचार करण्याचे टाळले. गेले.

या अधिवेशनांत सहकारी सोसायटी संबंधी, लक्ष्मेश्वर तालुक्यांतील विणक-यांना मदत करणे, लक्ष्मेश्वर तालुक्यांतील अनाथ रयतेस मदत करणे शेतक-यांना कमी दराने कर्ज पुरवठा करणे असे ठराव मंजूर करण्यात आले. मिरज संस्थान प्रजापरिषदेच्या वतीने निवडणुक विषयक नियम करण्याची मागणी केली. त्याप्रमाणे कायदेमंडळाच्या या अधिवेशनांत निवडणूकीच्या संदर्भात मतदार याद्या तयार करून आवश्यक ते नियम करण्याचे दरबारने मान्य केले.[११]

मिरज संस्थान कायदेमंडळाचे चौथे अधिवेशन १९३७

मिरज संस्थान कायदेमंडळाचे चौथे अधिवेशन, संस्थानचे दिवाण श्री. बा.का. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली ता. २२/११/१९३७ रोजी भरविण्यात

आले. हे अधिवेशन ता. २५/११/१९३७ अखेर चालले. कायदेमंडळाच्या अधिवेशनच्या पहिल्या दिवशी मिरज संस्थानातील गायरान, साक्षरतेचे प्रमाण, शेतकी शिक्षणाची सोय, जमिन महसुलीचा शे ३१ खर्च शेतकी सुधारणेकडे करणे या संबंधी चर्चा झाली आणि दरबारमार्फत मिरज तालुका कॉंग्रेस कमिटीवरील बंदी उठवल्याचे जाहिर करण्यात आले. यावेळी भाषणबंदीच्या ठरावावर विचार झाला नाही.

संस्थानचे पडणीस रा. कुलकर्णी यांनी अंदाजपत्रक चर्चेस मांडले. हे अंदाजपत्रक या वेळी उशिरा मांडण्यात येत असले तरी येथून पुढे नियमा-प्रमाणे वर्ष सुरु होण्यापूर्वी मांडण्याचे त्यांनी आश्वासन दिले. या अंदाज-पत्रकात १ लाख २० हजार खाजगी खर्च दाखविला होता. लोकोपयोगी कामाकरिता १ हजार ५०० रुपये खर्च दाखविला होता तसेच ग्रामोद्धारा-करिता १ हजार रुपये मंजूर केले होते. त्यानंतर दुसरे दिवशी अंदाजपत्रकावर सर्व साधारणपणे चर्चा सुरु झाली.

लक्ष्मेश्वरचे श्री. अभ्यंकर वकील यांनी जे भाषण केले त्यात ते म्हणाले की, "शेतक-याच्या दृष्टीने अंदाजपत्रक हे कुचकामी आहे." मोडनिंबच्या ना. शहांनी सुध्दा अंदाजपत्रकावर टीका केली. श्री. दालगांवर वैद्यानी शेतक-यांच्या सुधारणा करण्याकरिता कोणते उपाय योजावेत हे सांगितले श्री. मराठे वकीलांनी काही गुप्त गोष्टी दाखवून देऊन बजेटमधील बसत्कार उघडकीस आणला.

अधिवेशनाच्या तिस-या दिवशी प्रथम श्रीमंत राजेसाहेबांना "राजा" ही पदवी मिळाल्याबद्दलचा मिरज संस्थानातील रयतांची आर्थिक परि-स्थिती पाहण्याकरिता व कर्जमुक्त करण्याकरिता एक कमिटी नेमण्याचा ठराव मंजूर केला. अशाच प्रकारे शाळामधून शक्तीचे शारीरिक शिक्षण

लक्ष्मेश्वर येथील विणकरांची स्थिती सुधारणेचा ठराव सरकारी सभासदांचा विरोध असतानाही मंजूर करण्यात आला.

अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी, संस्थानचे नागरिकांना मुद्रण-स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य हे मुलभूत हक्क देण्याचा ठराव मंजूर केला अशाच प्रकारे, खेडेगांवात प्राथमिक शिक्षण मोफत व शक्तीचे, करणे मालगांव येथे बंधारा घालून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे, मोडनिंब तालुक्या-तील गरीब रयतेना बी-बीयाणे व रक्कम कमी व्याजाने देणे, बौध्दिक, औद्योगिक शिक्षण, ग्रामोद्धार व शेती सुधारणे संबंधी, देशी औषधांचे दवाखाने काढण्यांचे संबंधी ठराव मंजूर केले.[१२]

अशा रितीने मिरज संस्थान कायदेमंडळाचे चौथे अधिवेशन पार पडले परंतू त्यामध्ये काँग्रेस कमिटीवरील बंदी उठवली या शिवाय विशेष अशी सुधारणा झाल्याचे दिसत नाही. शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारणे करिता विशेष अशी तरतुद अंदाजपत्रकात नव्हती परंतु गेस्ट हाऊसवर मात्र दीड लाख रुपये खर्च दाखला होता. त्यामुळे लोकमतास जबाबदार असणा-या कायदेमंडळाची स्थापना म्हणजे केवळ जगाला दाखविणारे एक नाटक ठरले.

श्रीमंताचे कायदेमंडळाबाबतचे धोरण

मिरज संस्थानात कायदेमंडळाची स्थापना झाल्यानंतर तिची अधिवेशने नियमाप्रमाणे होत होती. दरम्यान श्रीमंतांनी ता. १३/७/१९३८ रोजी जादा गॅझेट काढून त्यातील सातव्या कलमात, "मिरज संस्थानामध्ये जबाबदार राज्यपध्दती अंमलात आणाऱ्याचे ध्येय दरबारास मान्य आहे"

असे जाहीर केले. त्यामुळे मिरज संस्थानच्या लोकांचा राज्यकारभारामध्ये अधिक प्रमाणात वाढणार होता. व या प्रमाणे एक योजना दरबारने आखून कायदे मंडळाच्या रचनेत बदल करण्याचा व मतदानाचा अधिकार विस्तृत करण्याचा उपक्रम हाती घेतला गेला.[१३]

श्रीमंत राजे नारायणराव तात्यासाहेब पटवर्धन यांच्या कारकिर्दीत संस्थानचे दिवाण व डिस्ट्रिक्ट जज्ज यांच्या सल्याने कायदेमंडळाची एक घटना तयार करून ती हिंदुस्थान सरकारकडे मंजुरीसाठी पाठवली होती.

मिरज संस्थान कायदेमंडळाचे पाचवे अधिवेशन १९३९

मिरज संस्थान कायदेमंडळाचे पाचवे अधिवेशन संस्थानचे दिवाण श्री. बा.का. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली १९ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर १९३९ अखेर असे एकूण चार दिवस भरले होते. सुरवातीस गृहमंत्री श्री. कुर्लेकर यांनी पूर्वीच्या अधिवेशनातील ठरावाचा व प्रश्नाचा काय विचार केला हे सांगितले. त्यानंतर ग्रामोद्धारावरील रक्कम खर्च का झाली नाही, निरक्षरतेच्या संबंधी, ७०,००० रु. शेतकरी हितार्थ ट्रस्ट योजना जाहीर करण्याबाबतची चर्चा झाली.

त्यानंतर श्री. कुर्लेकर यांनी संस्थानचे अंदाज पत्रक विधेयक मांडले. या अंदाजपत्रकात ७ लाख १६ हजार ५९८ रु. जमा बाजूकडे व ७ लाख १८ हजार ६८५ रुपये खर्च बाजूकडे दाखवून जवळ जवळ २ हजार रुपयांचे तुटीचे अंदाजपत्रक सादर केले होते. त्यात खाजगी खर्चाकरिता ६० हजार रुपये दाखविले. या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी लोकल बोर्ड ॲक्ट स्थापन करण्याचा ठराव मंजूर केलण्यात आला.

अधिवेशनाच्या दुसरे दिवशी अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा झाली. ना. शहांनी अंदाजपत्रकातील शेतक-याकरिता केलेली अल्प तरतूद, त्यात आमूलाग्र सुधारणा करावी असे सुचविले, तर ना. श्री. दालगांवकर यांनी लोकांची उत्पादक शक्ती वाढवावी, श्री. मराठे वकीलांनी विधायक गोष्टी करण्याकरिता २ हजार ५०० रुपये ही रक्कम अपुरी आहे त्यात बदल करावा अशी सूचना केली.

अधिवेशनाच्या तिसरे दिवशी, श्री. गाडगोळी वकील (लक्ष्मेश्वर) यांनी कार्यकारी मंडळ नेमण्याबाबत दरबारचा विचार नाही, जबाबदार राज्यपध्दतीचे हप्ते ठरले नाहीत यासंबंधी प्रश्न विचारले, आणि अंदाज-पत्रकावरील विभागाते, कायदा-न्याय खात्यावरील होणा-या सर्व रकमेवर टीकात्मक चर्चा केली.

अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी श्रीमंत राजेसाहेब यांनी लक्ष्मेश्वर येथील रयतेनी केलेल्या पुन्हा सारा वाढ चळवळीनुसार जी सारा सूट जाहीर केली त्या संबंधी अभिनंदनाचा ठराव मंजूर केला. शेवटी संस्थानचे दिवाण यांनी मिरज संस्थानच्या स्थितीचे निवेदन केले व प्रजेसंबंधी दरबारला केव्हाही सहानुभूती आहे असे सांगितले. या संदर्भात ना. शहा व श्री. मराठे वकील यांनी प्रजा ही दरबारला सहकार्याचा हात देईल असे आश्वासन दिले.[१४]

मिरज संस्थान कायदेमंडळाचे सहावे अधिवेशन १९४०

मिरज संस्थानच्या कायदेमंडळाचे सहावे अधिवेशन ता. १ मे पासून ते ३ मे, १९४० पर्यंत भरले होते. या अधिवेशाचे अध्यक्ष श्री. बा.का. जोशी हे होते. या अधिवेशानास श्रीमंत नारायणराव तात्यासाहेब हजर राहतील असे वाटले होते परंतु ते हजर राहिले नाहीत. या अधिवेशानाच्या

प्रारंभी ना. श्री. पोतनीस, ना. श्री. कुर्लेकर यांनी मुदत संपण्यामुळे राजीनामे दिल्यामुळे त्यांच्या जागी नवे सभासद श्री. आगाशे व शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर ना. बडवे यांनी श्रीमंत कै. गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन हे ता. ११/१२/१९३९ रोजी मृत्यू पावल्याबद्दलचा शोक प्रदर्शक ठराव मांडला. त्यानंतर कायदेमंडळाचे कामकाज स्थगित करण्यात आले.

दुपारी पूर्वीच्या कायदेमंडळातील ठराव, त्याची अंमलबजावणी, लोकल बोर्ड ॲक्ट संबंधी चर्चा झाली. संस्थानचे नवे अर्थमंत्री ना. भडभडे यांनी अंदाजपत्रक विधेयक कायदेमंडळात सादर केले. सदर अंदाजपत्रकात जमा बाजूस ७ लाख ३५ हजार रुपये असून खर्च बाजूस ७६ लाख ६२ हजार रुपये दाखवले होते. म्हणजे २७ हजार रुपये तुटीचे अंदाजपत्रक होते. त्या-मध्ये साजगी खर्चाकरिता १ लाख रुपये धरले आणि लोकपयोगी खात्यातील रकमेत कपात करून ती दुस-या खात्यात वाढ करून दाखविली होती. अधि-वेशनाच्या दुसरे दिवशी श्री. बालचंद्र शहा व इतर आठ सभासदांनी सर्व साधारण चर्चा केली. या अधिवेशनाच्या दुसरे व तिसरे दिवशी जे ठराव मंजूर केले होते. त्यातील महत्वाचे ठराव म्हणजे, संस्थानच्या प्रजाजनांना शक्य तितक्या लवकर राजकीय हक्क देणे, व्यापा-यास उत्तेजन देणे, परस्थांची नोकर भरती कमी करणे हे मंजूर केले होते.[१५]

संस्थानातील राजकीय सुधारणा करण्याबद्दल मार्च १९४० मध्ये व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी नरेंद्र मंडळाच्या बैठकीत सूचना केली होती. त्याचप्रमाणे अखिल भारतीय संस्थान लोकपरिषदेच्या स्थायी समितीनेही लोकशाहीप्रणित राजकीय सुधारणा करण्याची आवश्यकता

प्रतिपादन करून, ताबडतोब जबाबदार राज्यपध्दतीची स्थापना करण्याची मागणी केली.

यास अनुसरून मिरज संस्थानच्या, श्रीमंत राजेसाहेब श्री. नारायणराव तात्यासाहेब पटवर्धन यांनी ता. १० जानेवारी १९४२ रोजी एक जाहीरनामा काढून द्विदल राज्यपध्दतीचा पहिला हप्ता राजकीय सुधारणेबाबतचा जाहीर केला. अशा प्रकारे मिरज संस्थानांत द्विदल राज्यपध्दती स्थापन करण्याचे आश्वासन राजेसाहेबांनी दिले.

नवीन राजकीय सुधारणेनुसार कायदेमंडळाचे स्वरूप

मिरज संस्थानातील राज्यकारभार हा द्विदल राज्यपध्दतीनुसार लवकरच सुरू करण्यात येणार होता. त्याकरिता श्रीमंतानी मिरज संस्थान कायदे-मंडळाचा १९३२ मधील कायदा दुरूस्त करून त्यास आधुनिक लोकशाही शासनपध्दतीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. त्याप्रमाणे श्रीमंतांनी ता. १० जानेवारी १९४२ एक जाहीरनामा काढला आणि कायदेमंडळाच्या रचनेत स्वरूपात बदल केला. तोच द्विदल राज्यपध्दतीचा राजकीय सुधारणेचा नमूना म्हणून ओळखला जातो. या द्विदल राज्यपध्दतीनुसार जाबाबदार राज्यपध्दतीचा एक हप्ता म्हणून मिरज संस्थानी प्रजेला होता. कायदे

कायदेमंडळाचे स्वरूप:

या जाहीरनाम्यानुसार मिरज कायदेमंडळाच्या सभासद संख्येत वाढ करण्यात आली. त्याचे स्वरूप असे ठेवले होते की, कायदेमंडळाची एकूण सभासद संख्या ३० राहील. त्याची विभागणी लोक नियुक्त सभासद

UNIVERSITY, KOLAPUR

२० आणि सरकार नियुक्त सभासद १० अशी राहील. सरकार नियुक्त सभासदांपैकी ५ सरकारी अधिकारी व ५ बिन सरकारी अधिकारी असतील.

कार्यकाल:

कायदेमंडळाचा कार्यकाल पहिल्या बैठकीपासून ५ वर्षे राहील कायदेमंडळाच्या बैठका वर्षातून निदान २ वेळा तरी भरविल्या जातील.

कायदेमंडळाचा अध्यक्ष:

श्रीमंत राजेसाहेबांना, कायदेमंडळातील लायक किंवा त्रयस्थ इसमास कायदेमंडळाचा अध्यक्ष नेमण्याचा अधिकार होता. मात्र त्रयस्थ व्यक्तीची नेमणूक केल्यास त्यास राजेसाहेब बिन अधिकारी सरकार-नियुक्त जादा सभासद म्हणून त्याची प्रथम नेमणूक करीतील. अध्यक्ष हा कायदेमंडळाच्या बैठकीचे कामकाज पाहील. संस्थानचे दिवाण हे कामाच्या सोयीकरिता अध्यक्ष राहतील मात्र कायदेमंडळाच्या बैठकी-च्या अध्यक्षस्थानी ते काम करणार नाहीत. या दोघा अध्यक्षांनी कायदेमंडळाच्या कामाची व्यवस्था आपसात सोयी प्रमाणे करावी.

लोकनियुक्तापैकीच मंत्री:

श्रीमंत राजेसाहेब प्रथमत: बहुमतवाल्या पक्षापैकी एकाची नियुक्ती मंत्री म्हणून करतील. तसे करणे शक्य न झाल्यास कायदेमंडळातील इतर कोणत्याही सभासदास मंत्री म्हणून नेमले जाईल. त्याच्याकडे सोपीव खात्याचा कारभार दिला जाईल. लोकनियुक्त मंत्री हे सोपीव

खात्यापुरते कायदेमंडळास जबाबदार व श्रीमंत राजेसाहेबांना जबाबदार राहतील. लोक नियुक्त मंत्र्याचा पगार हा कार्यकारी मंडळाच्या सभासदाइतका राहील.

कार्यकारी मंडळ:
==========

राज्यकारभाराच्या सोयीसाठी एक कार्यकारी मंडळ नेमले जाईल. त्यामध्ये दिवाण साहेब हे कार्यकारी मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष राहतील. एक कौन्सिलर श्रीमंतानी नेमावयाचा आणि लोकनियुक्त मंत्री हे या कार्यकारी मंडळाचे सभासद राहणार होते.[१६]

दरम्यानच्या काळात महात्मा गांधीजींनी सुरु केलेल्या "चले जाव चळवळीचा" प्रभाव मिरज संस्थानातील प्रजेवर पडला आणि प्रजेने श्रीमंत राजेसाहेबांच्या सभाबंदी, मिरवणूक बंदीच्या जाहीर नाम्याचे उल्लंघन केले. या चळवळीतील प्रजा पुढाऱ्यांना पकडून तुरुंगात ठेवले परंतु कांही काळानंतर के. शिखरे व्यतिरिक्त इतर सर्वांची ब्रिटिश हिंदुस्थानात सुरु असलेल्या चळवळीशी कांहीही संबंध नाही या कारणानुसार मुक्तता केली. प्रजापरिषदेच्या पुढाऱ्यांनी श्रीमंत राजेसाहेबांकडे मिरज संस्थानात जबाबदार राज्य-पध्दतीची स्थापना करण्याची मागणी केली. त्यास मान्यता देऊन श्रीमंत राजेसाहेबांनी ता.१०/१२/१९४२ रोजी एक जाहीरनामा काढून कमिटी नेमण्याचे जाहीर केले आणि त्यामध्ये संस्थान मजकुरी जबाबदार राज्यपध्दती पूर्वी जाहीर केल्याप्रमाणे मान्य केले असून ते अमलात आणण्याचे आपले धोरण असल्याचे सांगितले होते. त्यानंतर जो ता. १०/६/१९४३ रोजी एक जाहीरनामा काढला त्या सरनाम्यात असे घोषीत केले की, परिस्थितीच्या संदर्भानुसार जाबाबदार राज्य-

पध्दतीचे शासन प्रजेला राज्यकारभारात सहभागी होण्याकरिता लवकरच अंमलात आणले जाईल. अशा रितीने श्रीमंतानी आपले अखेरचे ध्येय संपूर्ण जाबाबदार राज्यपध्दती लोकास देण्याचे जाहीर केले. व त्याकडे जाण्यासाठी द्विदल राज्यपध्दतीचा एक हप्ता दिला. द्विदल राज्यपध्दतीत जे कांही दोष असतील त्यांची दुरुस्ती बखले घटना समिती करणार होती.

श्रीमंतानी मिरज संस्थान कायदेमंडळाच्या स्थापनेचा १९३२ चा कायदा केल्यापासून राजकीय सुधारणेबाबत जे वेळोवेळी स्वत:चे मत व धोरणानुसार जे जाहीरनाम्याद्वारे व्यक्त केले त्याप्रमाणे मिरज संस्थानी प्रजेला अंशत: का होईना अधिकार मिळाले होते. हे अधिकार दान म्हणजे जबाबदार राज्यपध्दतीच्याकडेच जाणारे आहेत. तेव्हा केंव्हा पूर्ण होणार हे काळ व लोकांच्या पात्रतेवर अवलंबून राहील. तो पर्यंत द्विदल राज्यपध्दतीने राज्यकारभाराची सुरवात होते आहे. त्यामुळे श्रीमंताचे वचनभंग किंवा प्रतिगामी धोरणे होते असे म्हणता येणार नाही.

श्रीमंत राजेसाहेब श्री. नारायणराव तात्यासाहेब पटवर्धन यांनी श्री. आर.आर. बखले यांच्या अध्यक्षतेखाली विशेष आज्ञापत्रक ता. १४ जून १९४३ रोजी काढून एक घटना समिती नेमली होती. त्या समितीमध्ये इतर चार सभासदांचा समावेश केलेला होता. परंतु या समितीस प्रजापरिषदेने सहकार्य दिले नाही, प्रजेनेही प्रश्नावलीचे उत्तरे, समक्षपणे साक्षी दिल्या नाहीत, त्यामुळे श्रीमंतांनी पुढे ता. २७/९/१९४४ रोजी जादा गझीट काढून तिचे विसर्जन केले.

श्रीमंत राजेसाहेब श्री. नारायणराव तात्यासाहेब पटवर्धन यांचे द्विदल राज्यपध्दतीचे दान आणि कायदेमंडळाचे स्वरूप

श्रीमंत राजेसाहेब श्री. नारायणराव तात्यासाहेब पटवर्धन यांनी ता. १० जून १९४३ रोजी विशेष आज्ञापत्रक काढले. त्यात ते म्हणतात की, "आपल्या प्रजेस क्रमाक्रमानें संस्थानच्या राज्यकारभारांत सहभागी करण्याच्या मिरज दरबारच्या अधिकृत धोरणानुसार" खालील घोषणा करण्यात येत आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा पहिला हप्ता म्हणून राजेसाहेब असे ठरवित आहेत की, अ) एक कार्यकारी मंडळाची स्थापना करणे, ब) मिरज संस्थानच्या परिस्थितीचा विचार करून व्यापक प्रमाणावर मतदान पध्दती विस्तृत करून त्या त्यावर अधिष्ठित असलेले एक प्रातिनिधिक स्वरूपाचे कायदेमंडळ निर्माण करणे. क) द्विदल शासन पध्दतीची अंमलबजावणी करणे.

श्रीमंत साहेबांना पूर्वीचे जे हक्क, सत्ता, अधिकार वंशपरंपरेने मिळाले होते ते तसेच राहून मिरज संस्थानच्या परिस्थितीमध्ये बदल झाला तर ते राज्यकारभाराच्या अनुरोधाने योग्य वाटतील त्या अध्यक्षाकडे सत्ता संक्रमण करतील असे म्हटले.

श्रीमंत राजेसाहेबांनी राज्यकारभाराचे राखीव आणि सोपीव असे दोन विभाग केले होते. पहिल्या विभागाचा राज्यकारभार हा दिवाण व कार्यकारी कौन्सिलकडे तर सोपीव खात्याचा कारभार कायदेमंडळाच्या निवडून आलेल्या लोकनियुक्त मंत्र्याकडे सोपविला

होता. दिवाण व कार्यकारी कौन्सिलर्स श्रीमंत राजेसाहेबांना जबाबदार राहतील व लोक नियुक्त मंत्री हे राजेसाहेब आणि कायदेमंडळाला जबाबदार राहणार होते. कार्यकारी मंडळातील तिन्ही मंत्री आपआपसात सहकार्याने राज्यकारभार चालवतील. अंदाजपत्रकाचे अ) राखीव, ब) सोपीव असे दोन करण्यात आले होते. जंगली, तैनात, देवस्थान देणाऱ्या पगार, बेन्शन, खाजगी खर्च, इत्यादी खात्यांना मंजूर केलेली रक्कम सोडून इतर कोणत्याही खात्याची रक्कम ठरविण्याचा अधिकार हा तीन मंत्र्याच्या सल्ला-नुसार श्रीमंत राजेसाहेबांना दिला होता. याप्रमाणे लोकनियुक्त मंत्री आपल्या खात्याचे खर्चाकरिता कायदेमंडळाला अंदाजपत्रक सादर करतीलच ते मंजुरी करिता कायदेमंडळात ठेवतील. मंजूर झालेल्या रकमेप्रमाणे खर्च झाले आहे किंवा नाही हे पाहण्याचा अधिकार कायदे-मंडळास दिला होता. मात्र अंदाजपत्रकास श्रीमंत राजेसाहेबांची मंजूरी घेणे आवश्यक होते.

राखीव खात्याच्या अंदाजपत्रकातील तरतुदीवर लोकनियुक्त मंत्र्यांना चर्चा करण्याचा अधिकार दिला होता.

मिरज संस्थानच्या राज्यकारभाराची जबाबदारी श्रीमंत राजेसाहेबांवर असल्यामुळे वेळप्रसंगी एखादा कायदा किंवा वटहुकूम अंमलात आणाऱ्याचा अधिकार राजेसाहेबांकडे विशेष अधिकार म्हणून बहाल केलेला होता.

कार्यकारी मंडळाचे स्वरूप:

श्रीमंत राजेसाहेबांनी विशेष आज्ञापत्रक ता.१४ जून १९४४ ला

कादून पुढीलप्रमाणे कार्यकारी मंडळाचे स्वरूप निश्चित केले.

कार्यकारी मंडळात श्रीमंतानी नेमलेले कौन्सिलर्स आणि कायदे-मंडळातील लोक नियुक्त सभासदांतून श्रीमंतानी नियुक्त केलेले मंत्री याचा समावेश होईल. मंत्री हे श्रीमंताची मर्जी असे पर्यंत अधिकार पद ग्रहण करतील. कार्यकारी मंडळात संस्थानचे दिवाण हे कायम पणे कार्यकारी मंडळात राहतील. श्रीमंत राजेसाहेब हे कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष राहतील, त्यांच्या गैरहजेरीत दिवाण हे सभाध्यक्ष राहतील. कार्यकारी मंडळातील कौन्सिलर्स श्रीमंतांनी जबाबदार राहतील तर लोकनियुक्त मंत्री हे कायदेमंडळाला जबाबदार राहातील. मंत्र्याना कायदेमंडळाचा जोपर्यंत पाठिंबा आहे तोपर्यंत ते अधिकार पदावर राहातील, पाठिंबा नसेल तर त्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागेल.

कायदेमंडळाचे स्वरूप:
==========

नवीन मिरज संस्थान कायदेमंडळातील सभासदांची एकूण संख्या ३० ही राहिल. त्याची विभागणी २० लोकनियुक्त सभासद आणि १० सरकार नियुक्त सभासद अशी केली होती. सरकार नियुक्त सभासदापैकी ५ हून अधिक सरकारी अधिकारी असणार नाहीत.

लोकनियुक्त २० सभासदांची निवडणूक, जनरल मतदार संघ १५ व स्पेशल मतदार संघ ५ अशी होणार होती. जनरल मतदार संघातील १५ सभासदांची विभागणी ही खेडेगांवातर्फे १० यामध्ये

दोन जागा, मुसलमान व अस्पृश्ययाकरिता राखीव ठेवल्या होत्या. तर शहरातर्फे ५ जागा त्यामध्येही एक जागा राखीव ठेवली होती.

स्पेशाल मतदार संघातील ५ सभासदांची निवड ही खालील प्रमाणे होणार होती. ते असे की, अ) विद्याविभाग - १, ब) व्यापारी - १, क) जमिनदार - १, ड) स्त्री - १, इ) तैनातदार - १.

यामधील स्त्री विभागाकरिता राखीव जागा मिरज शहरा-करिता १० वर्षापुरती ठेवली होती आणि ती ही एक प्रयोग म्हणून पाहण्यासाठी अशी तरतूद केली होती. स्त्री उमेदवाराची निवडणूक ही दरबारने ठरविलेल्या १०० स्त्रियामधूनच होणार होती.[१७]

द्विदल राज्यपध्दतीचे स्वरूप:

हिंदुस्थान सरकारच्या सन १९१९ च्या कायद्यानुसार प्रांतात जे द्विदल राज्यपध्दतीचे स्वरूप होते तसेच मिरज संस्थानातील द्विदल राज्यपध्दतीचे राहिले. श्रीमंत राजेसाहेबांकडे ब्रिटिश सरकारशी संबंध, संस्थानिकांशी संबंध, खाजगी खर्च, खंडणी, देणग्या वगैरे बाबतचे अधिकार पूर्णपणे पूर्वीसारखेच ठेवले होते.

नव्या राज्य घटना कायद्यानुसार मिरज संस्थानात जबाबदार राज्यपध्दतीची सुरवात:

श्रीमंत राजेसाहेब, त्यांचे वारस, त्याच्या नंतर गादीवर येणारे अधिपती यांच्या छत्राखाली संपूर्णपणे जबाबदार राज्यपध्दती

मान्य करण्यात आलेले ध्येय वेळ येताच गाठता यावे म्हणून व हा हेतू साध्य करण्यासाठी, संस्थानी राज्यकारभाराशी संस्थानी प्रजेचा वाढत्या प्रमाणात संबंध याचा आणि अधिक सहभाग वाढावा असे मिरज दरबारचे धोरण पूर्वी जाहीर झाले होते. श्रीमंत राजेसाहेब श्री. नारायणराव तात्यासाहेब पटवर्धन यांनी आपल्या पाचव्या राज्यारोहण प्रसंगी ता. १२/१/१९४५ रोजी पहिला राज्यशासन कायदा मिरज संस्थानात जाहीर केला व त्याची अंमलबजावणी लवकरच करण्यात येईल असे सांगितले. हया कायद्यामध्ये अनेक प्रगतशील वैशिष्ट्यांचा समावेश केला होता. या शिवाय हिंदुस्थान सरकारच्या १९१९ च्या कायद्यानुसार प्रांतिक कायदेमंडळाच्या बाबतीत जे अधिकार दिले होते त्याच प्रमाणे अधिकार मिरज संस्थान कायदेमंडळाला दिले होते. तिची अंमलबजावणी परस्पर सहकार्याने समंजसपणे केली तर निश्चितपणे नव्या राज्यघटनेचा उपयोग लोकांचे अधिक अधिक कल्याण साध्य करण्यासाठी होईल. त्याकरिता मिरज संस्थानातील प्रजेने ही घटना श्रध्दा, निश्चयाने राखावी अशी प्रजाजनास राजेसाहेबांनी विनंती केली होती.[१८] अशा रितीने श्रीमंत राजेसाहेबांनी एक जाहीरनामा काढून बखले कमिटीच्या विसर्जनानंतर राजकीय सुधारणेचा नवीन हप्ता बहाल केला.

मिरज संस्थान राज्यशासन १९४५ च्या पहिल्या कायद्यानुसार कार्यकारी मंडळ व कायदेमंडळाचे स्वरूप:

श्रीमंत राजेसाहेबानी ता. १२ जानेवारी १९४५ रोजी मिरज संस्थानात द्विदल राज्यपध्दती चा स्वीकार करण्यासाठी पहिला

राज्यशासन कायदा जाहीर केला. या कायद्यानुसार कार्यकारी मंडळ व कायदेमंडळाचे स्वरूप पुढील प्रमाणे निश्चित केले.

कार्यकारी मंडळाचे स्वरूप:

श्रीमंत राजेसाहेबांनी जाहीर केलेल्या नवीन राजकीय सुधारणेनुसार, एक कार्यकारी मंडळाची स्थापना राज्यकारभारास मदत करण्याकरिता केली. या कार्यकारी मंडळात राजेसाहेब, दिवाण, एक किंवा अनेक राजनियुक्त मंत्री, आणि एक किंवा लोकनियुक्त राहतील. कायदेमंडळातील लोक नियुक्त सभासदांपैकी एक किंवा अनेक मंत्र्याची निवड राजेसाहेबांकडून होईल. ज्यावेळी एकापेक्षा अधिक मंत्री निवडण्यात येतील तेव्हा पहिल्या मंत्र्याचा सल्ला घेतला जाईल मात्र पहिल्या मंत्र्याची निवड राजेसाहेब स्वतःच करतील. कायदेमंडळाने एखाद्या लोकनियुक्त मंत्र्यावर अविश्वास व्यक्त केल्यास सर्व मंत्रीमंडळ बरखास्त होईल. त्यांच्या मध्ये राज्यकारभाराची खात्याची विभागणी करण्याचा अधिकार श्रीमंत राजेसाहेबांना होता. कार्यकारी मंडळाचे अध्यक्षस्थानी श्रीमंत राजेसाहेबच राहणार होते. उपाध्यक्षपद हे दिवाणाकडे दिले होते. श्रीमंताच्या गैरहजेरीत दिवाण हे अध्यक्षपदी राहणार होते. या दोघांच्याही अनुपस्थितीत कार्यकारी मंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थानी लोकनियुक्त मंत्री राहणार होते.

कार्यकारी मंडळाचे निर्णय सर्वसाधारणपणे बहुमताने घेतले जातील. दिवाण हे कार्यकारी मंडळाचे पदसिद्ध पहिले सभासद

राहतील. आणि ते कार्यकारी मंडळाचे निर्णय, आज्ञा, कायदे याची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अंमलबजावणी करतील. इत्यादी तरतुदी यात होत्या.

कार्यकारी मंडळातील सभासदांचा कार्यकाळ हा राजेसाहेबांच्या मर्जीवर अवलंबून राहील.[१९]

कायदेमंडळाचे स्वरूप:

मिरज संस्थानचे कायदेमंडळ हे एकूण ३० सभासदांचे होते. त्यामध्ये राजेसाहेबांचा समावेश एक अविभाज्य घटक म्हणून करण्यात आला. कायदेमंडळाच्या ३० सभासद संख्येची विभागणी ही २१ लोक नियुक्त सभासद आणि ६ सरकारी अधिकारी सभासद व ३ सरकार नियुक्त बिन अधिकारी सभासद अशी केली होती. याप्रमाणे कायदेमंडळात लोकनियुक्त सभासदांचे बहुमत निर्माण करण्यात आले.

कार्यकाल: कायदेमंडळाचा कार्यकाल पाच वर्षांचा केला होता.

अध्यक्ष:

श्रीमंत राजेसाहेबांना पहिली पाच वर्षे बिन अधिकारी कायदेमंडळाचा अध्यक्ष म्हणून नेमण्याचा अधिकार होता. त्यानंतर पुढील पाच वर्षे कायदेमंडळाने अध्यक्षपदासाठी निवडून दिलेल्या यादीतून राजेसाहेब एकाची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करणार होते आणि त्यानंतर कायदेमंडळाने निवडलेला सभासद हा अध्यक्ष होणार होता. याचा अर्थ असा की दहा वर्षानंतर कायदेमंडळास स्वत:चा अध्यक्ष निवडण्याचा

अधिकार दिला होता. उपाध्यक्षांची निवड ही प्रथमपासूनच कायदे-मंडळाकडून होणार होती.

कायदेविषयक अधिकार:

मिरज संस्थानचा राज्यकारभार शांततामय आणि सुव्यवस्थित-पणे चालविण्यासाठी आवश्यक ते विधेयक मंजूर करण्याचा अधिकार कायदेमंडळाला होता. परंतु त्या विधेयकास श्रीमंत राजेसाहेबांची मंजूरी आवश्यक होती. संस्थानच्या सुरक्षिततेला किंवा शांततेला धोका येईल अशा त-हेचे विधेयक कायदेमंडळाला मांडता येत नव्हते. मंत्र्याकडे सोपवलेल्या खात्यासंबंधी विधेयकास कायदेमंडळाने नकार दर्शविल्यास राजेसाहेबांना ते विधेयक आवश्यक वाटत असल्यास मंजूर करण्याचा अधिकार होता. अशा विधेयकास मान्यता देण्यापूर्वी ते फेरविचारार्थ आपल्या शिफारशीसह कायदेमंडळाकडे परत पाठवतील व त्यानंतर ते संमती देतील किंवा देणार नाहीत.

आर्थिक अधिकार:

प्रत्येक वर्षी कायदेमंडळात अंदाजपत्रक सादर केले जाईल. त्यामध्ये अंदाजे खर्च दाखविला जाईल. खाजगी खर्च, परसंस्थानशी किंवा ब्रिटिश सरकारशी संबंधीत अशा कार्याचा व सरकारी अधिकारी यांचा पगार, पेन्शन संबंधी खर्चावर मतदान किंवा चर्चा करता येणार नव्हती. विधी मंडळाने नामंजूर केलेल्या किंवा कमी केलेल्या खर्चात वाढ करणे किंवा ते मंजूर करणे या संबंधीचे खास अधिकार श्रीमंत राजेसाहेबांकडेच होते. आवश्यकता पडल्यास कायदेमंडळापुढे पूरवणी अंदाजपत्रक सादर करण्याची तरतूद होती.

कायद्यातील दुरुस्त्या:

दहा वर्षानंतर, कायदेमंडळाला ३/४ बहुमताने हा कायदा दुरुस्त करण्याचा अधिकार होता. मात्र या कायद्याच्या परिशिष्टात असलेल्या बाबतीत हा नियम लागू नव्हता कायदा दुरुस्तीसाठी कार्यकारी मंडळ आणि श्रीमंत राजेसाहेबांची मान्यता आवश्यक होती.

नियमात सुधारणा:

पाच वर्षानंतर कायदेमंडळाला २/३ बहुमताने या कायद्यान्वये करण्यात आलेल्या नियमात दुरुस्त्या राजेसाहेबांच्या संमतीनुसार करण्याचा अधिकार होता.

इतर अधिकार:

कायदेमंडळाचे अधिवेशन चालू नसताना परिस्थितीच्या संदर्भानुसार राजेसाहेब जे कायदे करतील त्यास कायदेमंडळाची मंजूरी आवश्यक होती. कायदेमंडळाने मान्यता दिली नाही तर अशे कायदे सहा आठवड्यानंतर रद्द होतात. त्याच प्रमाणे संकटकालीन परिस्थितीनुसार श्रीमंत राजेसाहेबांकडून जे वटहुकूम काढले जातील. त्याचा अंमल हा फक्त सहा महिन्यापुरता राहाणार होता. असे वटहुकूम कायदेमंडळाच्या पुढे मान्यतेसाठी ठेवले जातील आणि मान्यतेनंतर त्याचे कायद्यात रूपांतर होईल. अशीही त्यात तरतूद करण्यात आली होती.[२०]

वरीलप्रमाणे कायदेमंडळाचे जे कायदेविषयक आणि आर्थिक

अधिकार वाढवलेले होते ते इतर संस्थानांतील कायदेमंडळापेक्षा अधिक प्रगतीपर स्वरूपाचे होते. सन १९१९ च्या हिंदुस्थान सरकारच्या सुधारणा कायद्यात दिलेले अधिकार या कायदेमंडळाच्या अधिकारीच्या बरोबरीचे असून द्विदल राज्यपध्दतीतील दोष काढून टाकण्याचा प्रयत्न या कायद्यान्वये केला होता.

वरील मिरज संस्थानमध्ये राज्य शासन कायदा लागू केल्यानंतर दरबारतर्फे कायदेमंडळातील लोकनियुक्त सभासदांची निवडणूक तारीख १७ सप्टेंबर १९४५ ही ठरवली होती. कायदेमंडळाच्या या निवडणुकीत २१ लोक नियुक्त सभासदांपैकी प्रजा-परिषदेनें एकूण १४ जागा बहुमताने जिंकल्या. आणि मिरज संस्थान कायदा १९४५ नुसार श्रीमंत राजे-साहेबांनी प्रजा-परिषदेच्या बहुमतवाल्या सभासदांपैकीच कायदेमंडळात श्री. आण्णासाहेब कुरणे यांची नियक्ती पहिले लोक नियुक्त मंत्री म्हणून केली. श्रीमंत राजेसाहेबानी कार्यकारी मंडळाने बनवले. त्यातील सभासद खालीलप्रमाणे होते.

कार्यकारी मंडळ सभासद

१) मिरज संस्थानचे दिवाण, श्री. रावसाहेब गोखले, डी.एस्.

२) जि.जज्ज व दुसरे कौन्सिलर श्री.रावसाहेब फडके व्ही.व्ही.

३) लोकनियुक्त मंत्री श्री. आण्णासाहेब कुरणे
(शिक्षण, आरोग्य, लोकपयोगी खाती दिली होती)

सरकार नियुक्त सभासदांची नेमणूक

१) श्री. बी.एन्. तट्टी

२) श्री. डी.एस्. गोखले (दिवाण)

३) श्री. रावसाहेब फडके व्ही.व्ही.
(जि. जज्ज व दुसरे कौन्सिलर)

४) श्री. बेडेकर, स्टेट इंजिनिअर

५) श्री. कार्लेकर आर.व्ही.

६) श्री. डॉ. गोसावी.

सरकार नियुक्त बिन सरकारी अधिकारी

७) डॉ. आर.एच्. प्राणी

८) डॉ. डी.पी. गोर्डे

९) श्री. पी.एन्. बडवे.

मिरज संस्थान कायदेमंडळाचे अध्यक्ष:

मिरज संस्थान कायदे मंडळाचे अध्यक्ष म्हणून श्रीमंत राजेसाहेबांनी श्री. रघुनाथ बडले यांची नियुक्ती केली.[२१]

वरील प्रमाणे मिरज संस्थानात नवी विटी - नवे राज्य - राजकीय सुधारणेनुसार सुरु झाले.

नवीन मिरज राज्यशासन कायद्यानुसार कायदेमंडळाचे पहिले अधिवेशन १९४५:

मिरज संस्थान कायदेमंडळाचे नवीन राज्यशासन कायद्याप्रमाणे पहिले अधिवेशन ता. २६ ते २८ डिसेंबर, १९४५ रोजी संस्थानचे दिवाण,

श्री. आर. आर. बखले यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या अधिवेशनात प्रजा-परिषदेचे सभासद श्री. हनमंतराव व्य. गाडगोळी यांची कायदे-मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. श्रीमंत राजेसाहेबांनी उद्घाटन भाषणात आपला मनोदय असा व्यक्त केला की, "प्रजेच्या कल्याणाकरिता आपण प्रयत्न करू, त्यास प्रजा प्रतिनिधींनी साहय करावे."

त्यानंतर या अधिवेशनात मिरज संस्थानला खाजगी कर्ज देणे बाबत, शेती योजना, युध्दोत्तर पुर्नघटनेबाबतची योजना, हिशोब समिती, मिरज संस्थानची शिल्लक रक्कम, कोर्टाच्या जबान्या, स्वतंत्र विद्याधिकारी नेमणे या विषयांवर प्रश्नोत्तरे झाली.

या अधिवेशनात, दक्षिण संस्थानच्या सामाईक हायकोर्ट योजनेत सामील होण्याचा, प्रजा-परिषदेची राज्यघटना दरबारने अंमलात आणण्याच्या शिफारशींचा, सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्या-ना प्रवेश देण्याच्या आगामी भारतीय घटना समितीवर मिरज संस्थान-तर्फे लोक नियुक्तांनी निवडलेल्या सभासदासच पाठवावे असे ठराव मंजूर केले होते.[२२]

मिरज संस्थान कायदेमंडळाचे अंदाजपत्रकी दुसरे अधिवेशन १९४६:

मिरज संस्थान कायदेमंडळाचे अंदाजपत्रकी दुसरे अधिवेशन ता. २८ मे ते ३१ मे १९४६ अखेर संस्थानचे दिवाण श्री.आर.आर. बखले यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या अधिवेशनाच्या उद्घाटनपर भाषणात श्रीमंत म्हणाले की, "सध्याच्या राजकीय संक्रमणाच्या काळात होणा-या घडामोडी जागरूकतेने पाहाणे व विचारपूर्वकमत बनविणे ही गोष्ट

अत्यंत जरुरीची आहे. आपले संस्थान लहान असले तरी राज्य-कारभारात लोकमताला अधिक प्रमाणात वाव दिला गेलेला आहे. दक्षिण महाराष्ट्रात सर्व संस्थानचे एक संघराज्य स्थापन होत आहे त्यात मीही सहभागी होत आहे. तेव्हा इतर संस्थानांतील प्रजे-प्रमाणे आपणाही सहकार्य कराल अशी आशा बाळगतो."

या अधिवेशनात अर्थमंत्री, श्री. आर.व्ही. कार्लेकर यांनी अंदाजपत्रक विधेयक मांडले. या अंदाजपत्रकात जमा बाजूस ९ लाख ५४ हजार ३०० रुपये दाखविले होते तर खर्च बाजूस ९ लाख ४६ हजार ३२ रुपये दाखविले होते. या खर्च रक्कमेपैकी खाजगी खर्च १ लाख ६० हजार ३०० रुपये राखीव म्हणून दाखविले होते. याप्रमाणे एकूण ८ हजार २६८ रुपयाचे शिल्लकी अंदाजपत्रक होते. या अंदाज-पत्रकात दुष्काळ निवारण्यासाठी २० हजार रुपये व लक्ष्मेश्वर तालुक्या-तील बसापूर भागाला ६ हजार ५०० रुपये मंजूर झाले. त्याच प्रमाणे शेती सुधारणेकरिता ८ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली.

यानंतर गोळीबार, धान्य खरेदी विक्रीतील काळाबाजार व लाच-लुचपत बाबत चौकशी समती नेमण्याची चर्चा होऊन त्यासंबंधीचे ठराव मंजूर करण्यात आले.[२३]

संघराज्य निर्माण करण्याकरिता संस्थानांमध्ये प्रथम जबाबदार राज्यपद्धती स्थापन करणे महत्त्वाचे होते व त्यानुसार अधिक प्रमाणात श्रीमंत राजेसाहेबांनी मिरज संस्थानात ता. २० एप्रिल १९४७ रोजी एक जाहीरनामा काढून नवीन राजकीय सुधारणा जाहीर केल्या. त्यामुळे मिरज संस्थानचा दर्जा दक्षिण महाराष्ट्रातील इतर संस्थानापेक्षा

वरचा ठरला. या राजकीय सुधारणे नुसार श्रीमंत राजेसाहेबांच्या अधिपत्याखाली संपूर्ण जबाबदार राज्यपध्दतीचे ध्येय गाठल्याचे जनतेला पटले होते. या जाहीर नाम्यानुसार कार्यकारी मंडळातील राज्यमंत्री व श्री. राजेसाहेबांचे अधिकार कमी केली तसेच कायदे-मंडळातील सरकार नियुक्त व बिनसरकारी अधिकारी नियुक्त करु नये ही प्रजा-परिषदेची मागणी श्रीमंतांनी मंजूर केली.

कार्यकारी मंडळाचे स्वरूप:

या नव्या बदलाप्रमाणे कायदेमंडळात निवडून आलेल्या सभा-सदामधून तीन मंत्र्याचे एक कार्यकारी मंडळ नेमले जाईल, त्यापैकी एक मंत्री हा कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष होईल. त्याची नियुक्ती ही कायदेमंडळात निवडून आलेल्या बहुमतवाल्या पक्षाच्या पुढा-यांशी विचारविनिमय करून राजेसाहेब करतील उरलेल्या मंत्र्याची निवड ही या अध्यक्षाच्या सल्यानुसार राजेसाहेब करतील. मंत्रीपदावर नेमणूक करण्याकरिता कमीत कमी मॅट्रिकपर्यंत शिक्षण पूर्ण झाले पाहिजे. कार्यकारी मंडळातील मंत्री हे पूर्णपणे कायदेमंडळाला जबाबदार राहतील. सामुदायिक जबाबदारी तत्वाची स्वीकार केला जाईल. राजेसाहेबांच्या खास जबाबदारीच्या बाबी सोडल्या तर बाकीच्या राज्यकारभारातील सर्व खात्यावर मंत्री मंडळाचा अधिकार चालेल. मंत्रीमंडळास पूर्ण अधिकार देण्यात आले. मंत्रीमंडळाच्या निर्णयाचा फेरविचार करण्याचा व ती अवस्था पूर्ण होईपर्यंतच फक्त निर्णयाची अंमलबजावणी स्थगीत करण्याचा तेवढा अधिकार श्रीमंताकडे राखून ठेवलेला होता.

दिवाण हे पद मंत्र्यांचा हुकूम अंमलात आणणारा अधिकारी असे

करण्यात आले. त्याचा दर्जा मंत्रीमंडळातील मंत्र्यापेक्षा खालचा केला गेला. परंतु त्यात दिवाणाचा राज्यकारभाराविषयक अनुभवाचा फायदा मंत्र्यानी करून घ्यावा अशी तरतूद करण्यात आली होती. अशा रितीने दिवाण मंत्रीमंडळाच्या हाताखाली काम करण्यास अधिकारी ठरला होता.

कायदेमंडळाचे स्वरूप व अधिकारात वाढ:

कायदेमंडळातील सर्व २१ जागा लोकनियुक्त सभासदांच्या करण्यात आल्या. कायदेमंडळाचा अध्यक्ष हा या सभासदांमधून निवडला जाई. श्रीमंत राजेसाहेबांना पूर्वीप्रमाणे आपल्या अनुमतीनुसार अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडता येणार नव्हते. कायदेमंडळाच्या निवडणूका न घेताच नवीन सुधारणा अंमलात आणाल्या गेल्या. कायदेमंडळातील ९ सरकार नियुक्त सभासद काढून घेतले. कायदेमंडळाचे निवडणूकीचे नियम, दुरुस्तीविषयक कायद्याचे नियम रद्द करण्यात आले. मंत्र्याकडे सोपविलेल्या सर्व खात्याबाबतचे अधिकार पूर्णपणे अनियंत्रित करण्यात आले. राजेसाहेबांचे अधिकार त्यांच्या खास व विशेष आखत्यारी खालील विषयापुरतेच मर्यादीत करण्यात आले.

कायदा व न्याय ही खाते मंत्र्याकडे सोपविण्यात आली. राजेसाहेबांच्या खास अधिकारातील बाबीत आणखी भर घातली. संरक्षण, गंगाधरराव बाळासाहेब मिरज शहर पाणी पुरवठा योजना, संस्थानचे मिरज स्टेट बँकेशी संबंध, सर्व सरंजाम इनाम व त्याचे विषयीचे प्रश्न, संस्थानचा लवाज, या संस्थानी पाहुणे, देणग्या, देवस्थान व धर्मदाय इत्यादी खाती श्रीमंताकडे राखीव म्हणून ठेवली होती.

संस्थानच्या नोकर वर्गाच्या नेमणूका करण्यास्तव कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष, दिवाण व राजेसाहेबांनी नेमलेले बिनअधिकारी गृहस्थ यांचे लोकसेवा आयोग बनविण्यात आले.

जाहीरनाम्याच्या शेवटी, या सुधारणांचा स्वीकार जनतेने चांगल्या वृत्तीने करावा. नवीन सुधारणेनुसार घटना कायदा लवकरच जाहीर केला जाईल व त्याच दिवशी त्याचा अंमल सुरु होऊन त्यामध्ये १९४७-१९४८ चे अंदाजपत्रक मंत्रीमंडळाकडून मांडले जाईल.[२४] असे आश्वासन देण्यात आले.

श्री. शंकरराव देव यांचा अभिप्राय: श्री देव यांनी श्रीमंत राजेसाहेबांना जे पत्र पाठवीले होते, त्या पत्रात ते लिहितात की, "आपण प्रजेला जे हक्क दिले आहेत त्याबद्दल आपले अभिनंदन, मिरज संस्थानातील जनता व तिचे पुढारी मिळालेल्या राजकीय हक्कांचा आलेल्या जबाबदारीची जाणीव ठेवून संपूर्ण स्वराज्यासाठी तयारी करण्याकडे त्याचा उपयोग करून घेतील."

डॉ. पट्टाभीसीतारामय्या यांचा अभिप्राय:

"मिरज संस्थानातील सुधारणांची योजना प्रजेच्या व हिंदी जनतेच्या अभिनंदनास राजेसाहेब पात्र आहेत. या संस्थानने हिंदुस्थानातील इतर संस्थानांना उदाहरण घालून दिले आहे. या नवीन राजकीय सुधारणेनुसार श्रीमंत राजेसाहेबांनी आपल्या वैयक्तिक कारभाराऐवजी जबाबदार सरकार अस्तित्वात आणले आहे.[२५]

दक्षिण संस्थानांचा संघ अस्तित्वात आला तर या सुधारणा अल्पजीवी ठरतील एवढीच भीती वाटते.

मिरज संस्थान कायदेमंडळाचे अधिवेशन: १९४७.

मिरज संस्थान कायदेमंडळाचे अधिवेशन, कायदेमंडळाचे उपाध्यक्ष श्री. ह.व्य. गाडगोळी यांच्या अध्यक्षतेखाली ता. २४/४/१९४७ रोजी भरले. या प्रसंगी प्रथमत: संस्थानचे दिवाण व कायदेमंडळाचे नेते श्री. वैद्य यांचा शपथविधी झाला. त्यानंतर श्री. गाडगोळी यांनी श्री. शाहा, श्री. पेंडसे यांचे कायदेमंडळ चेअरमनचे पॅनल निवडले त्यानंतर हिशोब समितीवर श्री. कोरे, श्री. गलाडिक, डा. गोसावी, श्री. बेडेकर यांची नियुक्ती जाहीर केली.

यानंतर कायदेमंडळाचे नेते, श्री. वैद्य यांनी खर्चाचे अधिकृत पत्रक व जादा खर्चास लागणारे खर्च पत्रक कायदेमंडळात सादर केले. यानंतर कायदामंत्री श्री. फडके यांनी शेतकरी कर्ज विमोचन कायदा, मुंबईतील नवे बील विचारात घेऊन ते पुढे मांडण्यात येईल असा खुलासा केला. यानंतर भाडेनियंत्रण विधेयक तिन वाचनानंतर मंजूर केले होते.

ना. कुरणे यांनी मिरज शहर पाणी पुरवठ्याचा ठराव मांडला व तो मंजूर झाला. अशा प्रकारचे मिरज संस्थान सेंट्रल अेक्साईज व. साल्ट अॅक्ट व इंडियन आईल सीडस् कमिटी अॅक्टचा ठराव मंजूर केले होते.[२६]

मिरज संस्थानांत २७ एप्रील १९४७ मध्ये जबाबदार राज्यपध्दती अंमलात आणली. लोकनियुक्त सभासदांचे कायदेमंडळ बनविण्यात आले

आणि त्यातील तीन सभासदांची नेमणूक मंत्रीपदावर केली. त्या-प्रमाणे मिरजेचे नवे लोकमंत्री खालील प्रमाणे होते.

१) पंतप्रधान व मंत्रीमंडळाचे अध्यक्ष, बहुमतवाल्या पक्षाचे नेते, डॉ.वि.मा गोखले, हे मिरज संस्थान कायदे मंडळातील प्रजा-पक्षाचे. (मिरज)

२) मंत्री: श्री. द.ना. गाडगोळी (लक्ष्मेश्वर)

३) मंत्री: श्री. मारुती हरी महाडिक (मोडनिंब)
यांचा मंत्रीमंडळातील मंत्री म्हणून १९ मे १९४७ रोजी शपथविधी व अधिकार ग्रहण करण्याचा समारंभ पार पडला. मंत्रीमंडळामध्ये मिरज संस्थानातील तिनही तालुक्यांना समान प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले होते.

मंत्र्यांची खाते विभागणी:

तीन मंत्र्यांमध्ये पुढीलप्रमाणे खाते विभागणी केली होती.

१) डॉ. वि.म. गोखले:	कायदा व सुव्यवस्था, जमिन महसुल वजनेमापे, बिनराखीव नोकरवर्ग, अबकारी.
२) श्री.द.ना.गाडगोळी:	अर्थ, विधिमंडळ, निवडणूकी, स्टॅम्प, धर्मदाय कायदा व न्याय, नोंदणी, संस्थान हिशोब तपासणी, लोकप-योगी खाते, औद्योगिक वादीसबंधी प्रश्न मंजूर वगैरे.

३) श्री.मा.ह. महाडिक: स्थानिक स्वराज्य, शेतकी, छापखाना, शिक्षण, पशु वैद्यकीय, पतपेठ्या, परवठा व नियंत्रण खाते हे तिनही मंत्री चालवणार होते.[२७]

मिरज संस्थानांत अशा रितीने लोकशाही पध्दतीने राज्य-कारभार करण्यास सुरुवात केली होती.

मिरज संस्थानांत नवीन १९४७ चा कायदा:

मिरज संस्थानांत श्रीमंत नारायणराव तात्यासाहेब पटवर्धन यांनी ता. १९ मे १९४७ रोजी एक नवीन महत्त्वाचा कायदा मंजूर केला या कायद्यान्वये श्रीमंत राजेसाहेब व राजघराणे यांच्या हक्क संरक्षणाची तरतूद केली. हा कायदा, राजघराण्याचे व्यक्तीगत हक्क व मिळकतीचा कायदा म्हणून जाहीर करण्यात आला. या कायद्यान्वये हिंदुस्थान सरकार, प्रांतिक सरकार, मिरज संस्थान अगर इतर कोणतेही संस्थान, यामधील कायदा, ठराव अगर वट-हुकूमान्वये किंवा रुढीन्वये, संस्थानाप्रतिचे विशेष हक्क सुरक्षित राहतील.

मिरज संस्थान कायदेमंडळाचे नवीन कायद्यानुसार पहिले अधिवेशन: १९४७:

मिरज संस्थान कायदेमंडळाचे नवीन कायद्यानुसार पहिले अधिवेशन ता. १ जून १९४७ रोजी श्री.व्ही.व्ही. पेंडसे यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते.

कायदेमंडळाचे अध्यक्ष श्री. पेंडसे यांनी श्रीमंत राजेसाहेबांचा संदेश, "स्वार्थ त्याग व सहकार्याची वृत्ती ठेवावी" असा वाचून दाखविला होता. यावेळी श्री. श.गु. कोरे यांची कायदेमंडळाचे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड केली, त्यानंतर श्री. श.कृ. दप्तरदार यांची कायदेमंडळाच्या उपाध्यक्षपदी एकमताने निवड केली. श्री. कोरे, श्री. पेंडसे, श्री.झारी यांची कायदेमंडळाच्या अध्यक्षपदासाठीचे पॅनेल निवडले होते.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी साबडे खुनाची चौकशी करण्याबाबतचा जमखंडी दरबाराचा विनंती वजा ठराव मंत्र्यास दरमहा २५० रुपये व १०० रुपये भत्ता देण्याचा ठराव मंजूर केला होता.

अधिवेशनाचा दुसरा दिवस:
==========

अधिवेशनाच्या दुसरे हरिजनांच्या अस्पृश्यता निवारण इत्यादी मागण्याबाबत साखर वाटप, संबंधी प्रश्नोत्तरे झाली. त्यानंतर, संस्थानात आर्थिक योजना व सुधारणा समिती नेमणे, पोलिस व सी.आय.डी. खाते कार्यक्षम करणे, शाळांना अनुदान देणे, प्राथमिक शिक्षण शक्तीचे करणे आणि ठराव मंजूर करण्यात आले.[२८]

१४ जुले १९३९ ला राजेसाहेबांनी कायदेमंडळ स्थापन करण्याची मागणी मान्य केली आणि त्यानुसार वर्षभरात पहिले कायदेमंडळ स्थापन केले. नंतरच्या काळामध्ये लोकमताच्या आणि लोकआंदोलनच्या सतत दडपणामुळे राजेसाहेबांना टप्याटप्याने हया कायदेमंडळातील

लोकप्रतिनिधींची संख्या वाढवावी लागली. शेवटी तर श्रीमंतानी संपूर्ण लोकशाहीवादी राज्यघटनाच अंमलात आणली.

मिरज संस्थानच्या या कायदेमंडळाचा प्रगतीचा इतिहास जर आपण पाहिला तर आपल्या लक्षात येईल की, या संस्थानात जागृत लोकमतामुळे कायदेमंडळाची अधिवेशने नियमीतपणे झाली. या अधिवेशनात मांडण्यात आलेले ठराव किंवा मान्य झालेले ठराव जरी पूर्णपणे कार्यवाहीत आणण्यात आले तरी त्या ठरावाचे स्वरूप फार मुलगामी होते. ह्या ठरावाप्रमाणे शाक्तीचे व मोफत शिक्षण, अस्पृश्य आणि हरिजनांचा उध्दार, व सुधारणा, स्त्री शिक्षण, शेती सुधारणा इत्यादी बाबतीत चर्चा करण्यात आली. तसा आशयाचे ठराव संमत करण्यात आले. त्यावरून प्रजा-परिषदेच्या पुढाऱ्यांची समाज सुधारणेविषयक जागरूक दृष्टी दिसून येते. शेतकऱ्यांच्या प्रश्नावरही या कायदेमंडळात मुलगामी चर्चा झाली. पतपुरवठा, कर्जमाफी, तगाई, दुष्काळकामे हे आजही महत्त्वाचे असणारे विषय चर्चिले गेले. संस्थानातील पुढाऱ्यांना राजकीय शिक्षण मिळाले. परंतु यातील बहुतेक सर्व पुढारी स्वातंत्र्योत्तर काळात चमकले नाहीत याचे कारण म्हणजे मिरज संस्थानची भौगोलिक रचना हे होते. या संस्थानचे क्षेत्र विखुरलेले असल्यामुळे तेथील रयतेमध्ये काम करणारे पुढारी पुढे आलेले दिसत नाहीत. प्रजा-परिषदेचे सर्वात महत्त्वाचे पुढारी के. श्री.बा.वि. शिखरे यांच्या विनंतीला दाद न देता सत्तेत सामिल न होण्याचे आपले तत्त्व कायम ठेवले.

संस्थानाचे ताबडतोब भारतीय संघराज्यात विलिनीकरण झाल्यानंतर या छोटया लोकनियुक्त कायदेमंडळाचे महत्त्व राहिले नाही. पुढच्या प्रकरणामध्ये मिरज संस्थानच्या विलिनीकरणाच्या प्रश्नाची चर्चा करण्यात येईल.

प्रकरण चौथे

संदर्भ सूची

मिरज संस्थानातील कायदेमंडळाचे स्वरूप, अधिकार व कार्य

१. श्री. पटवर्धन, वि. अ. — संस्थानातील लोकशाहीचा लढा, संस्थानी कचेरी, पुणे १९४०, पान नं. १३०.

२. मिरज संस्थान प्रजापरिषद अहवाल, अधिवेशन पहिले, त्रोटक अहवाल, आर्य भूषण प्रेस, पुणे १९२७, पान नं. २.

३. श्री. पटवर्धन, वि. अ. — उपरोल्लिखित पान नं. ७४.

४. मिरज स्टेट गझेट, जाहीरनामा, ता. १४ जुलै, १९३१.

५. श्री. अग्रवाल, गु. रा. — मिरज संस्थानचा परिचय, मिरज प्रकाशन, मिरज प्रकाशन, १९४२, पान नं. ४४.

६. दैनिक, ज्ञान प्रकाश, पुणे, ता. २३ फेब्रुवारी, १९३२.

७. श्री. पटवर्धन, वि. अ. — अग्रलेख, "मिरज संस्थान कायदेमंडळाच्या अधिकाराचे स्वरूप" संस्थानी स्वराज्य, पुणे, ता. २३ फेब्रुवारी, १९३२.

८. दक्षिण महाराष्ट्र, साप्ताहिक, सांगली, ता. २२ फेब्रुवारी, १९३२.

९. दैनिक, ज्ञान प्रकाश, पुणे, ता. २६ सप्टेंबर, १९३२.

१०. दक्षिण महाराष्ट्र, साप्ताहिक, सांगली, ता. २२ जानेवारी, १९३४.

११. दक्षिण महाराष्ट्र, साप्ताहिक, सांगली, ता. १ जुलै, १९३५.

१२. दक्षिण महाराष्ट्र, साप्ताहिक, सांगली, ता. २९ नोव्हेंबर, १९३७.

१३. मिरज स्टेट गझेट, जाहीरनामा, ता. १३ जुलै, १९३८.

१४. दक्षिण महाराष्ट्र, साप्ताहिक, सांगली, ता. २ आक्टोबर, १९३९.

१५. दक्षिण महाराष्ट्र, साप्ताहिक, सांगली, ता. ६ मे, १९४०.

१६. मिरज स्टेट गझेट, जाहीरनामा, ता. १० जानेवारी, १९४२.

१७. मिरज स्टेट गझेट, जाहीरनामा, ता. १४ जून, १९४३.

१८. मिरज स्टेट जादा गझीट, जाहीरनामा, ता.१२ जानेवारी, १९४५.

१९. द.गव्हर्मेंट ऑफ मिरज (सी.) अक्ट १९४५ पान.नं.१६ ते १६.

२०. द.गव्हर्मेंट ऑफ मिरज (सी.)अक्ट १९४५, पान नं.१६ ते २९.

२१. संस्थानी स्वराज्य, साप्ताहिक, पुणे, ता.१३ ऑक्टोबर १९४५.

२२. दैनिक, ज्ञानप्रकाश, पुणे, ता. ३० डिसेंबर, १९४५.

२३. दैनिक, ज्ञानप्रकाश, पुणे, ता.२२ एप्रिल, १९४७.

२४. मिरज स्टेट गझीट जाहीरनामा, ता.२० एप्रिल, १९४७

२५. दैनिक, ज्ञानप्रकाश, पुणे ता.२२ एप्रिल, १९४७.

२६. दैनिक, ज्ञानप्रमाशान पुणे, ता. २७ एप्रिल, १९४७

२७. दैनिक, ज्ञानप्रकाश, पुणे, ता. १ मे, १९४७.

२८. दैनिक, ज्ञानप्रकाश, पुणे, ता. १ जून १९४७.

.....